ठाणे महानगरपालिका, ठाणे

नौपाडा प्रभाग समिती कार्यालय,
दिनांक : १५.११.२०११

मा.नौपाडा प्रभाग समिती सभा
सभा सूचना क्र. ७, दिनांक : १५.११.२०११
सभा क्र. १, दिनांक : १९.११.२०११

प्रति,

सन्मा.श्री/श्रीमती ____________________

सदस्य / सदस्या, नौपाडा प्रभाग समिती,

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, ठाणे महानगरपालिकेच्या मा.नौपाडा प्रभाग समितीची सभा शनिवार दि. १९.११.२०११ रोजी दुपारी ०४.०० मा.नौपाडा प्रभाग समिती कार्यालय येथील ''कै. मो. दा. जोशी सभागृह'' येथे सभा सूचना क्र. ७, दिनांक :१५.११.२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयावर विचार-विनिमय करण्यांसाठी आयोजित करण्यांत येत आहे.

कृपया सदर सभेस आपण उपस्थित राहावे, ही विनंती.

श्री. ज्ञानदेव सा. वाघुले
कार्यालयीन अधिक्षक / सचिव,
नौपाडा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

सभा सूचना क्र. ७, दिनांक : १५.११.२०११ ची विषयपत्रिका.

प्रकरण क्रमांक

विषय

१२६. सभा सुचना क्र.६ दि. २५.१०.२०११ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्तांत कायम करण्याबाबत.

१२७. नौपाडा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र. ६० मध्ये नगरसेवक निधी अंतर्गत महागिरी सुरज अपार्टमेंट येथे पायवाट करणे व परिसरात विविध स्थापत्य कामे करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

१२८. नौपाडा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र. ६२ मध्ये नगरसेवक निधी अंतर्गत सार्वजनिक ठिकाणी बेंचेस बसविणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

१२९. नौपाडा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र. ६४ मध्ये नगरसेवक निधी अंतर्गत

गडकरी पथ येथील श्रद्धा वडापाव सेंटर ते राम मारुती रोड येथे झाकणे बसवणे, पाईप बसवणे इ. काम करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

१३०. नौपाडा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र. ६९ मध्ये प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत रामचंद्र नगर मधील गणपती मंदिर जवळील परिसरात विविध स्थापत्य कामे करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

१३१. नौपाडा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र. ६९ मध्ये नगरसेवक निधी अंतर्गत काजुवाडी येथील संत निरंकारी चौकाचे नुतनीकरण करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

१३२. नौपाडा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र. ६२ मध्ये नगरसेवक निधी अंतर्गत मंत्री प्लॉट येथील कांताबाई घरापासुन दळवी घरापर्यंत गटाराचे सुधारणा करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

सही/-श्री. ज्ञानदेव सा. वाघुले
कार्यालयीन अधिक्षक /

नौपाडा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका,

सचिव कार्यालय,
नौपाडा प्रभाग समिती,
सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.
दिनांक : १५.११.२०११
ठाणे.

**दिनांकः १९.११.२०११रोजी.**

**मा.अध्यक्ष महोदया, यांच्या पूर्व परवानगीने घेण्यांत येणारी आयत्यावेळेची प्रकरणे**

**प्रकरण क्र.१३३**

नौपाडा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र.६२ मध्ये "नगरसेवक निधी" अंतर्गत शिवाजी पथ, म.गांधी उद्यान, छ. शिवाजी मार्केट येथे झाकणे बसविणे, स्लॅब बांधणे इ. कामे करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**प्रकरण क्र.१३४**

नौपाडा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र.६३ मध्ये "नगरसेवक निधी" अंतर्गत सरोवर दर्शन, गणेश दर्शन आणि टेकडी बंगला परिसर येथे पायवाट करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**प्रकरण क्र.१३५** नौपाडा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र.६४ मध्ये "नगरसेवक निधी" अंतर्गत आपटे गल्ली, विष्णू नगर महात्मा फुले रस्ता येथे पदपथाकरिता पी.सी.सी. करणे इ. कामे करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**प्रकरण क्र.१३६** नौपाडा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र.६४ मध्ये "नगरसेवक निधी" अंतर्गत घंटाळी क्रॉस लेन कल्पना सोसायटी, सहयोग मंदिर येथे झाकणे बसविणे, पी.सी.सी. करणे इ. कामे करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**प्रकरण क्र.१३७** नौपाडा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र.६५ मध्ये "नगरसेवक निधी" अंतर्गत हिंदू कॉलनी येथील श्री यजेश्वर सहनिवास ते अल्हाद अपार्टमेंट पी.सी.सी. करणे, आल्हाद अपार्टमेंट समोर भिंतीकरिता गेट बसवणे व गोगटे चौकात नामफलक बसविणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**प्रकरण क्र.१३८** नौपाडा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र.६५ मध्ये "नगरसेवक निधी" अंतर्गत उत्तेकर चाळ येथील साईसदन ते रुक्मिणी अपार्टमेंट पर्यंत पायवाटेचे नुतनीकरण करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**प्रकरण क्र.१३९** नौपाडा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र.६७ मध्ये "नगरसेवक निधी" अंतर्गत विविध ठिकाणी बेंचेस बसविणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**प्रकरण क्र.१४०** नौपाडा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र.६२ मध्ये "प्रभाग सुधारणा निधी" अंतर्गत जुना आग्रा रस्ता येथील सेंट जॉन शाळालगत साईडपट्टी करिता पी.सी.सी. करणे झाकणे बसवणे इ. कामे करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**कार्यालयीन अधिक्षक/सचिव**
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

# ठाणे महानगरपालिका,ठाणे.

नौपाडा प्रभाग समिती.
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक :- १९.११.२०११.

## मा.नौपाडा प्रभाग समिती सभा
## सभा सुचना क्र.७ दि. १५.११.२०११
## सभा क्र.१ दि. १९.११.२०११

ठाणे महानगरपालिकेच्या नौपाडा प्रभाग समितीची सभा शनिवार दि. १९.११.२०११ रोजी दुपारी ठिक ०४.०० वाजता नौपाडा प्रभाग समिती कार्यालयातील कै.मो.दा.जोशी सभागृहात सभा सुचना क्र. ७ दि. १५.११.२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचारविनिमय करणेसाठी आयोजित करण्यांत आलेली होती. सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सौ. स्मिता मधुकर देशमुख हया उपस्थित होत्या.

सभेस खालील सन्मानीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | सौ. स्मिता मधुकर देशमुख | अध्यक्षा |
| २. | सौ.सुहासिनी (प्रतिभा) सुनिल लोखंडे | सदस्या |
| ३. | सौ. सुजाता भास्कर पाटील | सदस्या |
| ४. | श्री.नारायण शंकर पवार | सदस्य |
| ५. | श्री. प्रकाश धोंडू पायरे | स्विकृत सदस्य |
| ६. | श्री. मुकुंद रामचंद्र जाधव | स्विकृत सदस्य |
| ७. | श्री. पुंडलिक मारुती थोरवे | स्विकृत सदस्य |

सदर सभेस खालील सन्मानीय सदस्य गैरहजर होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.अशोक बारकु वैती | सदस्य |
| २. | श्री. विलास शिवराम सामंत | सदस्य |
| ३. | श्री. संजय संतु वाघुले | सदस्य |
| ४. | सौ. अनिता हिराकांत फर्डे | सदस्या |
| ५. | श्री.महदिप उर्फ मुन्ना बिष्ट | सदस्य |
| ६. | सौ.शांता शामजी सोलंकी | सदस्या |

सभा ठीक ०४.०० वा. सुरु होते.

<u>श्री. वाघुले - मा. कार्यालयीन अधिक्षक</u>
विषयपत्रिक वाचून दाखवितात.

श्री. पुंडलिक थोरवे - स्विकृत सदस्य

मा. अध्यक्षा महोदया, गांवदेवी मैदान याठिकाणी आरक्षित भुखंड असून, त्या ठिकाणी दुकान गाळे बांधण्यात येणार आहेत. परंतु अतिक्रमण होत आहे. याबाबत मला सविस्तर माहिती मिळावी.

श्री. नितीन पवार - कार्यकारी अभियंता, सार्व. बां. विभाग

मा. अध्यक्षा महोदया, गांवदेवी मैदान याठिकाणी दुकान गाळे बांधणेकरीता मार्किंगचे काम गेल्या ७,८ दिवसापूर्वी करण्यात आलेले आहे. सदर ठिकाणी १७४ बांधकामाची यादी आमच्याकडे आहे. अतिक्रमणबाबत मला माहिती नाही.

श्री. पुंडलिक थोरवे - स्विकृत सदस्य

मा. अध्यक्षा महोदया, आरक्षित भुखंड क्रमांक ५ बाबत आतापर्यंत काय प्रगती झाली आहे. सदर ठिकाणी अतिक्रमण झाले तर काय करणार. याबाबतची माहिती मिळावी.

श्री. श्याम गद्रे, कार्यकारी अभियंता, शहर विकास विभाग

मा. अध्यक्षा महोदया, आरक्षित भुखंड क्रमांक ५ बाबतचा नकाशा आंम्हाला मिळालेला नाही. तसेच भुखंड देखील आपल्या ताब्यात दिलेला नाही.

श्री. नारायण पवार - सदस्य

मा. अध्यक्ष महोदया, ठाणे शहरामधील शेतक-यांनी शहराच्या विकासाकरीता तसेच रस्त्यांच्या कामाकरीता आपली स्वतःची जागा दिलेली आहे. काही शेतक-यांनी बलिदान दिलेले आहे. परंतु त्यांना अद्यापपर्यंत दुकाने, घरे दिली गेलेली नाहीत. त्यातील काही नागरिकांना मिळाली. परंतु काही गरिब नागरिकांना आजतागायत दुकाने मिळाली नाहीत. हा त्यांच्यावर अन्याय आहे. संबंधित विभागातील अधिकारी बोलतात की, मार्किंग करुन दिल्यानंतर ताब्यात घेऊ. परंतु याबाबतची कार्यवाही ही महानगरपालिकेनीच केली पाहिजे. गार्डन, मैदाने यांचा ताबा महानगरपालिका घेत नसेल तर मग कोणी घ्यावी. ठेकेदारांनी घ्यावे का? आपण ताब्यात घेत नसल्यामुळे अशा ठिकाणी ठेकेदार ताबा घेवून अशा ठिकाणी ८, ८ मजली बांधकामे होत असतात.

महानगरपालिकेनी विकास कामांकरीता शेतक-यांची जागा घेतलेली आहे. हे आपल्याला माहिती नाही का ? हे आम्ही आपल्याला सांगावे का ? आम्ही सुफरवायझर करायचे का ? समजा एखाद्या परिसरात गटार तुटले, पाण्याची लाईन तुटली तर सन्मा. सदस्यांनीच तक्रार करायची का ? आपण प्रभागात फिरुन याबाबत पहाणी करणे ही आपली जबाबदारी नाही का ? मग जे. ई. काय काम करता. पाण्याची पाईप लाईन तुटली तर बांधकाम विभागाचे अधिकारी पहात नाही. कारण त्यांच्याकडे साहित्य नसते. परंतु आपण संबंधित विभातील अधिकारी यांना याबाबत माहिती देवू नाही शकत का? पाणी पुरवठा विभागातील अधिकारी आजच्या सभेत उपस्थित आहेत का ? जरी आपले काम नसेल परंतु संबंधित विभागातील अधिकारी यांच्याकडे तक्रार तरी केली पाहिजे. हे काम नागरिकांचे आहे का ? नागरिकांनी जर एखाद्या कामाबाबत सवलत (फि वैगरे माफ ) मागितली तर आपण देणार का? मग आपण त्यांना पुरेशा सुविधा पुरविणे ही आपली जबाबदारी नाही का? काम करणेकरीता नागरिकांनीच तक्रार केली पाहिजे का? तेव्हाच आपण काम करणार का?

रस्त्याच्या दुतर्फा असलेली झाडांची छाटणी अथवा विद्यूत बाबत काही तक्रारी असतात. ब-याच वेळा वेळेवर पोलचे लाईट पेटत नाही. कारण आपण शिस्तीने काम कधीच करीत नाहीत. विद्यूतची केबल देखील एका पोलवरुन दुस-या पोलवर टाकली जात असते. ती लोंबकळत असते. अशा वेळी काही दुर्घटना घडल्यास स्थानिक नागरिक संबंधित सन्मा. सदस्यांनाच दोष देत असतात. ठाणे शहरात आपण देखील राहत असतो. म्हणुन चांगली कामे झाली पाहिजेत. नागरिकांना चांगल्या सुविधा देणे गरजेचे आहे.

एखादे काम ठेकेदाराला दिले तर ते काम चांगल्या पध्दतीने झाले पाहिजे. त्याचा फायदा हा नागरिकांना होईल, याप्रमाणे काम झाले पाहिजे. पिण्याच्या पाण्याची लाईन टाकली तर सदर पाईप लाईनला पाणी येते की नाही, हे पहाणे ही जबाबदारी संबंधित विभागातील अधिका-यांचीच आहे. याबाबत आम्हाला वारंवार तक्रारी कराव्या लागत असतात. आम्ही महानगरपालिकेचे मुकादम झालो आहोत असे आता आम्हाला वाटु लागले आहे.

सन १९९२ साली मा. टी. चंद्रशेखर सो. आयुक्त म्हणून ठाणे महानगरपालिकेत आले होते. त्यावेळी ठाणे शहरातील मुख्य रस्त्याचे काम चांगल्या प्रकारे करण्यात आले होते. म्हणून त्यांना शाबासकी दिली जात असते.

परंतु सदरचे काम हे टी. चंद्रशेखर यांनी केलेले नाही. त्यांनी फक्त अधिका-यांना आदेश दिले होते. सदरचे काम हे अधिका-यांनीच केले होते.

श्री. पुंडलिक थोरवे - स्विकृत सदस्य

मा. अध्यक्षा महोदया, भुखंड क्र. ५ बाबत माहिती दिलेली आहे. परंतु सदरची माहिती ही असमाधानकारक दिलेली आहे. सदरचा भुखंड महानगरपालिकेने ताब्यात घेतला आहे का ?

श्री. श्याम गद्रे, कार्यकारी अभियंता, शहर विकास विभाग

मा. अध्यक्षा महोदया, भुखंड क्रमांक ५ बाबत आता रिमाइंडर काढलेले आहे. सदर भुखंडाचे नकाशा प्राप्त झाल्यानंतर काम करण्यात येणार आहे. सदरचा भुखंड महानगरपालिकेने ताब्यात घेतलेला नाही. परंतु ताब्यता घेणेबाबत महानगरपालिकेने कार्यवाही सुरु केलेलीआहे.

श्री. पुंडलिक थोरवे - स्विकृत सदस्य

मा. अध्यक्षा महोदया, संबंधित अधिकारी बोलतात की, नकाशा प्राप्त झाल्यानंतर काम करण्यात येणार आहे हे आम्ही गेली २५, ३० वर्षापुर्वीपासून ऐकत आहोत. आम्हाला सविस्तर अशी माहिती देण्यात यावी.

श्री. श्याम गद्रे, कार्यकारी अभियता, शहर विकास विभाग

मा. अध्यक्षा महोदया, सन्मा. सदस्य श्री. थोरवे सो. यांनी उपस्थित केलेली माहिती ही फाईली पाहिल्यानंतर देण्यात येईल.

श्री. मुकूंद जाधव - स्विकृत सदस्य

मा. अध्यक्षा महोदया, याठिकाणी सन्मा. सदस्य श्री. पवार सो. यांनी बरेच मुद्दे उपस्थित केले आहेत. त्याबाबत संबंधित विभागातील अधिकारी उत्तरे देणार आहेत का ?

श्री. पुंडलिक थोरवे - स्विकृत सदस्य

मा. अध्यक्षा महोदया, सन्मा. सदस्य श्री. पवार सो. यांनी उपस्थित केलेला मुद्दा असा आहे की, पाणी पुरवठा विभाग, सार्व. बांधकाम विभाग, आरोग्य विभागातील सर्व कर्मचारी अधिकारी यांचे एकमेकास सहकार्य नाही. जर एखाद्या परिसरात पाईप लाईनबाबत समस्या असेल आणि सार्व. बांधकाम विभागातील अधिका-यांच्या लक्षात आले तर त्याबाबत पाणी पुरवठा विभागातील अधिकारी यांना सदर समस्यांबाबत सांगितले पाहिजे.

श्री. प्रकाश पायरे - स्विकृत सदस्य

मा. अध्यक्ष महोदया तत्कालीन आयुक्त टी. चंद्रशेखर सो. यांनी ठाणे शहरातील रस्त्यात सुधारणा केली आहे. त्यावेळी काही रस्ते ही काँक्रिटीकरण करण्यात आले होते. कामाबाबत तेच तेच विषय प्रत्येक सभेत येत असतो. असे का होत असते. सभेत झालेल्या चर्चेनुसार कामे झाली पाहिजेत.

श्री. श्याम गद्रे, कार्यकारी अभियता, शहर विकास विभाग

आरक्षित भुखंड विकसित करण्याचे दोन तीन प्रकार आहेत. भुसंपादन करणेकरीता वेळ लागत असतो.

श्री. मुकूंद जाधव - स्विकृत सदस्य

मा. अध्यक्षा महोदया, गेल्या १५ दिवसापुर्वी संबंधित विभागातील अधिका-यास ड्रेनेजचे पाणी विहिरीत जात असल्याचे सांगितले होते. संबंधित अधिकारी उपस्थित आहेत का ?

मा. सहाय्यक आयुक्त सो.

मा. अध्यक्षा महोदया, सन्मा. सदस्य श्री.जाधव सो यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या संबंधिचे अधिकारी हे गांवदेवी मैदान याठिकाणी कामानिमित्त गेलेले आहेत. त्यांना आताच भ्रमणध्वनीवरुन सांगितले आहे.

श्री. प्रकाश पायरे - स्विकृत सदस्य

मा. अध्यक्षा महोदया, तलावपाळी याठिकाणी निर्माल्य टाकणेकरीता कुंडया ठेवण्यात आल्या आहेत. परंतु त्यांची अवस्था अत्यंत दैयनीय झालेली आहे. त्यामुळे आजुबाजूस वास येत असतो. निर्माल्य हे वाहत्या पाण्यात टाकावे ते तलावात टाकु नये. आजची अवस्था अत्यंत वाईट आहे. निर्माल्य कमी आहेत परंतु कचरा जास्त साचलेला आहे. पाण्याचे फवारे मारले जात असतात ही चांगली गोष्ट आहे. परंतु कच-यांमुळे वास येत असतो.

श्री. नितीन पवार, कार्यकारी अभियंता, सार्व. बां. विभाग

मा. अध्यक्षा महोदया, तलावात सर्व निर्माल्य टाकले जात आहे. हा आमचा अनुभव आहे. याबाबत दुसरे काही उपाययोजना करता येईल का याबाबत आरोग्य विभागातील अधिका-यांची विचारविनीमय करण्यात येईल.

श्री. प्रकाश पायरे - स्विकृत सदस्य

सकाळी नागरिक फिरायला जात असतात त्यावेळी कच-याचा वास येत असतो. कचरा साफ करण्यात येतो का?

श्री. विदे - स्वच्छता निरिक्षक

मा. अध्यक्षा महोदया, तलावपाळी येथील कचरा वेळेवर उचलण्यात येत असतो.

श्री. प्रकाश पायरे- स्विकृत सदस्य

गेल्या ८ दिवसापासुन मी पहात आहे की, तलावपाळी याठिकाणी कचरा पडत आहे याबाबतचे आपल्याला फोटो देवू का ?

श्री. नारायण पवार - सदस्य

मा. अध्यक्षा महोदया ठाणे शहरामधील रस्त्यावर रॅबिट, माती, व दगड पडलेले आहे. ते कोणी उचलावयाचे असते. याबाबतची माहिती देण्यात यावी.

श्री. नितीन पवार, कार्यकारी अभियंता, सार्व. बां. विभाग

मा. अध्यक्षा महोदया, रॅबिट उचलण्याचे काम हे सार्वजनिक बांधकाम विभागाची जबाबदारी आहे. परंतु साफसफाईचे असतील तर असे रॅबिट उचलण्याचे काम हे आरोग्य विभागाचे आहे.

श्री. नारायण पवार - सदस्य

मा. अध्यक्ष महोदया, नौपाडा हद्दीमधील एकही रस्ता असा नाही की, त्या रस्त्यावर रॅबिट पडलेले नाही. एका ठिकाणी रॅबिट टाकले की त्या ठिकाणी स्थानिक नागरिक कचरा टाकत असतात. मग सदर जागेला कचरा कुंडीचे स्वरुप प्राप्त होत असते. याबाबतची जबाबदारी कोणाची आहे.

श्री. नितीन पवार, कार्यकारी अभियंता, सार्व. बां. विभाग

मा. अध्यक्ष महोदया याबाबतची जबाबदारी आरोग्य विभागाची आहे.

श्री. नारायण पवार- सदस्य

मा. अध्यक्षा महोदया, नागरिकांना वेळेवर पिण्याचे पाणी मिळत नाही आणि काही ठिकाणी पाण्याने रस्ते धुतले जात असतात. तर रस्ता साफ करणेकरीता पाणी कुठून आणले जाते.

श्री. दळवी, स्वच्छता निरिक्षक, आरोग्य विभाग

मा. अध्यक्षा महोदया, रस्त्यावर माती पडलेली असेल तर सदरची माती उचलण्यात येत असते. आणि रस्ते धुण्याकरीता विहीरीतील पाण्याचा उपयोग केला जात असतो.

श्री. नारायण पवार - सदस्य

मा. अध्यक्षा महोदया, एकही रस्ता असा नाही की, रस्त्यावर रॅबिट पडलेले नाही संबंधित विभागातील अधिकारी प्रभागात फिरतात का ?  फिरत असतील तर त्यांना वस्तुस्थितीची माहिती होईल. आम्ही आमच्या प्रभागात फिरत असतो. त्यामुळे वस्तुस्थिती आम्हाला कळते. तसेच तलावामध्ये ६ , ७ झाडे आहेत. याबाबत लक्ष

देणे वृक्ष प्राधिकरण विभागाचे काम नाही का ? आम्ही सभेत येवून प्रभागामधील वस्तुस्थिती बाबत बोलत असतो. परंतु त्यांच्यावर काही उपाययोजना केली जात नसेल तर आम्ही बोलून तरी उपयोग काय? आम्हाला वेड लागले आहे का याठिकाणी येवून बोलण्याचे. याबाबत मा. सहाय्यक आयुक्त सो. यांनी लक्ष दयावे.

मा. सहाय्यक आयुक्त

मा. आयुक्त सो. सन्मा. सदस्य श्री. पवार सो. यांनी झांडांबाबत सांगितले आहे. परंतु सदरची झाडे ही सुरुवातीपासुनच तलावात आहेत.

श्री. नारायण पवार- सदस्य

मा. अध्यक्षा महोदया, मा. सहाय्यक आयुक्त सो. हे चुकीची माहिती देत आहेत. खरी वस्तुस्थिती काय आहे ती कार्यकारी अभियंता, श्री. नितीन पवार यांना माहिती आहे.म्हणून याबाबत श्री. नितीन पवार यांनी सांगावे की, झाडे कशी पडलेली आहेत.

श्री. नितीन पवार, कार्यकारी अभियंता, सार्व. बां. विभाग

मा. अध्यक्षा महोदया, तलावात पडलेल्या झाडांबाबत संबंधित विभागातील अधिकारी श्री. गावंडे यांना पत्र दिलेले आहे. सदरच्या झाडांबाबत २ , ३ दिवसात कार्यवाही करण्यांत येईल.

श्री. प्रकाश पायरे- स्विकृत सदस्य

मा. अध्यक्षा महोदया, नौपाडा प्रभाग समिती सभेत प्रत्येक विभागातील अधिका-यांनी चांगले काम करणे आवश्यक आहे. आणि त्यांनी स्वतःहून सांगितले पाहिजे की आमचे काम चांगले आहे .

मा. सहाय्यक आयुक्त सो.

नौपाडा प्रभाग समिती हद्दीमधील कामे ही १००% चांगली झाली आहेत आणि सर्व कर्मचारी / अधिकारी देखील चांगले काम करतात असे मी म्हणणार नाही परंतु नौपाडा प्रभाग समितीकडील लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांनी मिळून केलेल्या प्रयत्नांना यश आले आहे. नौपाडा प्रभाग समिती हद्दीमध्ये यापूर्वी १२ ठिकाणी कच-याचे स्पॉट होते. ते सर्व स्पॉट आता बंद करण्यात आले आहेत. नौपाडा प्रभाग समिती हद्दीमधील सर्व्हिस रोड आणि इतर प्रभाग समिती हद्दीमधील सर्व्हिस रोड पाहिले तर यांच्यात नक्कीच फरक दिसेल. नौपाडा प्रभाग समिती हद्दीमधील कामे ही गेल्या दोन वर्षापासून चांगली झाली आहेत. बरेच रस्ते ही फेरीवाला मुक्त झालेली आहेत. गोखले रोड, सॅटिस प्रकल्प रस्ते हे फेरीवाले मुक्त झालेले आहेत. कच-याच्याबाबतीत दररोज घंटा गाडयांच्या फे-या दोन होणे आवश्यक आहे. परंतु डंपींग ग्राऊंडचे अंतर पहाता दोन फे-या होत नाही. दिवसाला एकच फेरी होत असते हि वस्तुस्थिती आहे. याबाबत आमचे प्रयत्न चालु आहेत.

श्री. नारायण पवार - सदस्य

मा. अध्यक्षा महोदया, मा. सहाय्यक आयुक्त सो. हे सांगतात की, नौपाडा प्रभाग समिती हद्दीमध्ये ब-याच कामात सुधारणा झालेली आहे. परंतु सफाई कामगार काय काम करतात याबाबत संबंधित विभागातील अधिकारी यांनीच सांगावे.

श्री. दळवी, स्वच्छता निरिक्षक, आरोग्य विभाग

मा. अध्यक्षा महोदया, प्रत्येक हजेरी शेडवरील साफसफाई कर्मचा-यांना हद्दीनुसार काम नेमुन देण्यात आलेले आहे. त्यानुसार प्रत्येक कर्मचारी नेमुन दिलेले काम करीत असतो.

श्री. नारायण पवार- सदस्य

मा. अध्यक्ष महोदया, आताच संबंधित विभागातील अधिका-यांनी सांगितले की, साफसफाई कर्मचारी हे नेमुन दिलेले काम करीत असतात. परंतु नौपाडा हद्दीमध्ये कोणत्या परिसरात गटारं उघडे आहेत ते संबंधित विभागातील अधिका-यांनी दाखवुन दयावीत. सर्वच गटारं बंद असल्यामुळे साफसफाई कर्मचारी कोणते गटारं साफ करणार?

पूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागात बिगारी असायचे त्यामुळे संबंधित विभागातील अधिकारी स्वतः येवून स्थानिक सन्मा. सदस्यांना सांगायचे की कोणते गटाराचे काम करायचे आहे. परंतु आता बिगारीच दिसत नाही. कुठे गेली आहेत बांधकाम विभागातील बिगारी. पूर्वी साफसफाई करणेकरीता स्वतः मुकादम प्रभागात येत होते आता

कोणीही येत नाही. नागरिकांना खेळाचे मैदान, गार्डन, हॉस्पीटल, गाडयांसाठी पार्किंग अशा चांगल्या सुविधा देत असतो. परंतु हॉस्पीटलमध्ये पाणी देखील वेळेवर पुरविले जात नाही. ठाणे शहरातील नागरिकांकरीता आपण चार एजेंन्सीकडून पाणी घेत असतो. परंतु आवश्यकतेनुसार पाणी पुरवठा होत नाही. फक्त नियमावर बोट ठेवले जात आहे. आवश्यक असेल तर पाण्याचे मिटर बसवा. ते देखील बसविले जात नाही. जसा पाण्याचा वापर होईल तसे बील वसुल होईल. परंतु अशा उपाययोजना केल्या जात नाही. आम्ही सर्व सदस्यांनी याठिकाणी चर्चा करुन देखील त्याबाबत

उपाययोजना होत नसेल तर मग उपयोग काय ? यापूर्वी केंद्रशासनाने प्रगतीबाबत एक अहवाल दिलेला आहे त्यात तीन रंग दाखविण्यात आले आहेत. एक काळा रंग  दुसरा निळा रंग आणि तिसरा हिरावा रंग  त्यात काळा रंग म्हणजेच अतिशय धोक्याचा, हिरवा आणि निळे रंग हे चांगले आहेत. आपल्या ठाणे महानगरपालिकेस निळा, हिरवा म्हणून दाखवायचे असेल तर त्याप्रमाणे कामे झाली पाहिजेत.

ठाणे शहरातील प्रत्येक हॉस्पीटलमध्ये १०००, १५०० डेंग्यु, मलेरिया यासारखे पेशेंट ॲडमिट आहेत. याबाबत आरोग्य विभागातील संबंधित अधिकारी आपल्याला माहिती देतच असतील की कोणत्या परिसरातील किती नागरिक ॲडमिट आहेत. म्हणून वेळेवर औषध फवारणी देखील करणे गरजेचे आहे.

श्री. प्रकाश पायरे- स्विकृत सदस्य

मा. अध्यक्ष महोदया याठिकाणी सन्मा. सदस्य श्री. नारायण पवार सो. यांनी खरोखरच चांगले मुद्दे मांडलेले आहेत. कारण त्यांना कामाची खरोखरच मनापासुन आवड आहे. त्यामुळे कामांच्याबाबत तक्रारी मांडत असतात. त्यांच्या प्रभागात पाणी पुरवठा देखील चांगला होत असतो. नौपाडा प्रभाग समिती हद्दीमधील दरवर्षी ९०%  वसुली होत असते. परंतु यावर्षी पाण्याची बीले नागरिकांना उशिराने दिली गेली आहेत.

श्री. वाघुले - कार्यालयीन अधिक्षक

मा. अध्यक्षा महोदया, पाण्याची बीले नागरिकांना यावर्षी उशिराने दिली गेली आहेत कारण सर्व बीले ही संगणकावर करण्यात येत आहेत. पुढील वर्षापासुन नागरिकांना वेळेवर पाण्याची बीले दिली जातील

श्री. नारायण पवार- सदस्य

मा. अध्यक्ष महोदया, महानगरपालिकेकडूनच उशिराने नागरिकांना पाण्याची बीले दिली गेली आहेत. मग नागरिक  उशिराने बीले भरतील तर त्यांच्याकडुन उशिराने बील भरले म्हणून दंड वैगरे घेवु नका.

श्री. वाघुले - कार्यालयीन अधिक्षक

यावर्षी किती बीले लागली आहेत. याची माहिती घेण्यात येणार आहे. सर्व काम हे संगणकावर होत आहे. त्यामुळे उशिर झालेला आहे. आता संगणकाद्वारेच पावती देण्यात येणार आहे. गेल्या वर्षापर्यंत हाताने पावती दिली जात होती. पाण्याची बीले उशिराने जरी नागरिकांनी भरली तरी त्यांच्याकडून दंड घेण्यात येणार नाही.

श्री. नारायण पवार

मा. अध्यक्ष महोदया, प्रभागामध्ये डेंग्यु, मलेरियाचे पेशेंट आढळून येत आहेत. परंतु आता सुरवंट हयाचे प्रमाणात वाढ झालेली आहे. सुरवंटमुळे अंगाला खाज सुटते आणि लाल होत असते. त्यामुळे नागरिक घाबरत असतात.

श्री. नेरुरकर, उपमुख्य स्वच्छता निरिक्षक,

मा. अध्यक्ष महोदया, सन्मा. सदस्य श्री. पवार सो. यांनी सांगितल्याप्रमाणे याची पहाणी आम्ही केली आहे. आणि लगेच फवारणी  करण्यांत आली आहे. परंतु जे सुरवंट असतात ते झांडाच्या एकदम वरच्या भागावर असतात.

श्री. वाघुले - कार्यालयीन अधिक्षक

प्रकरण क्र. १२६ ते १३२ वाचून दाखवितात.

प्रकरण क्र. १२६ ते  १३२ मंजुर करण्यात येतात.

श्री. वाघुले - कार्यालयीन अधिक्षक

मा. अध्यक्षा यांच्या पूर्व परवानगी आयत्या वेळी आलेले प्रकरण क्र. १३३ ते प्रकरण क्र. १४० वाचून दाखवितात. प्रकरण क्र. १३३ ते १४० मंजुर करण्यात येतात.

**प्रकरण क्र. १२६** : सभा सुचना क्र.६ दि. २५.१०.२०११ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्तांत कायम करण्याबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र. १२७, दि. १९.११.२०११**

**ठराव** :-

ठाणे महानगरपालिकेच्या मा. नौपाडा प्रभाग समितीच्या दि. २५.१०.२०११ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्तांत ही समिती वाचून कायम करीत आहे.

सुचक :- सौ. सुजाता भास्कर पाटील | अनुमोदक :- सौ. सुहासिनी सुनिल लोखंडे

सर्वानुमते मंजूर

**सही/-सौ. स्मिता मधुकर देशमुख**
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**प्रकरण क्र.१२७**

**विषय:-** नौपाडा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र.६० मध्ये "नगरसेवक निधी" अंतर्गत महागिरी सुरज अपार्टमेंट येथे पायवाट करणे व परिसरात विविध स्थापत्य कामे करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.१२८, दि.१९.११.२०११**

**ठराव :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र. ६० मधील सन्मा.सदस्य श्री. महदिप बिस्ट यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु. १,०७,०००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा. उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.स. मार्फत करुन घेण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु. १,०७,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष सात हजार मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी, असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ. सुजाता भास्कर पाटील | अनुमोदक :- सौ. सुहासिनी सुनिल लोखंडे

सर्वानुमते मंजूर

**सही/-सौ. स्मिता मधुकर देशमुख**
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**प्रकरण क्र.१२८**

**विषय:-** नौपाडा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र.६२ मध्ये "नगरसेवक निधी" अंतर्गत सार्वजनिक ठिकाणी बेंचेस बसविणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.१२९, दि.१९.११.२०११**

**ठ रा व :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र. ६२ मधील सन्मा.सदस्या सौ.सुहासिनी सुनिल लोखंडे यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु. १,९८,०००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा. उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.स. मार्फत करुन घेण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु. १,९८,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष अठ्ठयाण्णव हजार मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी, असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ. सुजाता भास्कर पाटील　　　　अनुमोदक :- श्री. नारायण शंकर पवार

सर्वानुमते मंजूर

**सही/-सौ. स्मिता मधुकर देशमुख**
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**प्रकरण क्र.१२९**

**विषय:-** नौपाडा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र.६४ मध्ये "नगरसेवक निधी" अंतर्गत गडकरी पथ येथील श्रद्धा वडापाव सेंटर ते राम मारुती रोड येथे झाकणे बसवणे, पाईप बसवणे इ. काम करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.१३०, दि.१९.११.२०११**

**ठ रा व :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र. ६४ मधील सन्मा.सदस्य श्री. विलास शिवराम सामंत यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु. १,९८,०००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा. उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.स. मार्फत करुन घेण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु. १,९८,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष अठ्ठयाण्णव हजार मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका

अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी, असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ. सुजाता भास्कर पाटील अनुमोदक :- सौ. सुहासिनी सुनिल लोखंडे

सर्वानुमते मंजूर

**सही/-सौ. स्मिता मधुकर देशमुख**
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**प्रकरण क्र.१३०**

**विषय:-** नौपाडा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र.६९ मध्ये "प्रभाग सुधारणा निधी" अंतर्गत रामचंद्र नगर मधील गणपती मंदिर जवळील परिसरात विविध स्थापत्य कामे करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

११.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.१३१, दि.१९.११.२०११**

**ठ रा व :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र. ६९ मधील सन्मा.सदस्य श्री. अशोक बारकू वैती यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु. १,९९,८००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा. उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.स. मार्फत करुन घेण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु. १,९९,८००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष नव्याण्णव हजार आठशे मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी, असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ. सुजाता भास्कर पाटील अनुमोदक :- सौ. सुहासिनी सुनिल लोखंडे

सर्वानुमते मंजूर

**सही/-सौ. स्मिता मधुकर देशमुख**
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**प्रकरण क्र.१३१**

**विषयः-** नौपाडा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र.६९ मध्ये "नगरसेवक निधी" अंतर्गत काजुवाडी येथील संत निरंकारी चौकाचे नुतनीकरण करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.१३२, दि.१९.११.२०११**

**ठराव :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र. ६९ मधील सन्मा.सदस्य श्री. अशोक बारकू वैती यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु. १,५८,६००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा. उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.स. मार्फत करुन घेण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च १,५८,६००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष अठ्ठावन्न हजार सहाशे मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी, असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ. सुजाता भास्कर पाटील अनुमोदक :- सौ. सुहासिनी सुनिल लोखंडे

सर्वानुमते मंजूर

**सही/-सौ. स्मिता मधुकर देशमुख**
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**प्रकरण क्र.१३२**

**विषयः-** नौपाडा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र.६२ मध्ये "नगरसेवक निधी" अंतर्गत मंत्री प्लॉट येथील कांताबाई घरापासुन दळवी घरापर्यंत गटाराचे सुधारणा करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.१३३, दि.१९.११.२०११**

**ठराव :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र. ६२ मधील सन्मा.सदस्या सौ. सुहासिनी सुनिल लोखंडे यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु. १,९९,८००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा. अधिक्षक अभियंता, सा.बां. विभाग, ठाणे यांनी शिफारस केलेल्या सुशिक्षित बेरोजगार अभियंता मार्फत करुन घेण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु. १,९९,८००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष नव्याणव हजार आठशे मात्र) चे खर्चास मुंबई

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी, असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ. सुजाता भास्कर पाटील                    अनुमोदक :- श्री. नारायण शंकर पवार

सर्वानुमते मंजूर

**सही/-सौ. स्मिता मधुकर देशमुख**
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**मा.अध्यक्ष महोदया, यांच्या पूर्व परवानगीने घेण्यांत येणारी आयत्यावेळेची प्रकरणे**

**प्रकरण क्र.१३३**

**विषय:-** नौपाडा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र.६२ मध्ये "नगरसेवक निधी" अंतर्गत शिवाजी पथ, म.गांधी उद्यान, छ. शिवाजी मार्केट येथे झाकणे बसविणे, स्लॅब बांधणे इ. कामे करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.१३४, दि.१९.११.२०११**

**ठराव :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र. ६२ मधील सन्मा.सदस्या सौ. सुहासिनी सुनिल लोखंडे यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु. १,१७,५००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा. उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.स. मार्फत करुन घेण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु. १,१७,५००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष सतरा हजार पाचशे मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी, असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ. सुजाता भास्कर पाटील                    अनुमोदक :- श्री. नारायण शंकर पवार

सर्वानुमते मंजूर

**सही/-सौ. स्मिता मधुकर देशमुख**
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**मा.अध्यक्ष महोदया, यांच्या पूर्व परवानगीने घेण्यांत येणारी आयत्यावेळेची प्रकरणे**

**प्रकरण क्र.१ ३ ४**

**विषय:-** नौपाडा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र.६३ मध्ये "नगरसेवक निधी" अंतर्गत सरोवर दर्शन, गणेश दर्शन आणि टेकडी बंगला परिसर येथे पायवाट करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.१ ३ ५, दि.१ ९.१ १.२ ० १ १**

**ठ रा व :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र. ६३ मधील सन्मा.सदस्य श्री. नारायण शंकर पवार यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु. १,४६,१००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा. उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.स. मार्फत करुन घेण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु. १,४६,१००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष शेहेचाळीस हजार शंभर मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ 'अ' अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी, असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ. सुजाता भास्कर पाटील अनुमोदक :- सौ. सुहासिनी सुनिल लोखंडे

सर्वानुमते मंजूर

**सही/-सौ. स्मिता मधुकर देशमुख**
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**मा.अध्यक्ष महोदया, यांच्या पूर्व परवानगीने घेण्यांत येणारी आयत्यावेळेची प्रकरणे**

**प्रकरण क्र.१ ३ ५**

**विषय:-** नौपाडा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र.६४ मध्ये "नगरसेवक निधी" अंतर्गत आपटे गल्ली, विष्णू नगर महात्मा फुले रस्ता येथे पदपथाकरिता पी.सी.सी. करणे इ. कामे करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.१३६, दि.१९.११.२०११**

**<u>ठराव</u>:-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र. ६४ मधील सन्मा.सदस्य श्री. विलास शिवराम सामंत यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व

१५

आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु. १,२४,०००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा. उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.स. मार्फत करुन घेण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु. १,२४,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष चोवीस हजार मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी, असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ. सुजाता भास्कर पाटील अनुमोदक :- सौ. सुहासिनी सुनिल लोखंडे

सर्वानुमते मंजूर

**सही/-सौ. स्मिता मधुकर देशमुख**
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**<u>मा.अध्यक्ष महोदया, यांच्या पूर्व परवानगीने घेण्यांत येणारी आयत्यावेळेची प्रकरणे</u>**

**प्रकरण क्र.१३६**

**विषय:-** नौपाडा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र.६४ मध्ये "नगरसेवक निधी" अंतर्गत घंटाळी क्रॉस लेन कल्पना सोसायटी, सहयोग मंदिर येथे झाकणे बसविणे, पी.सी.सी. करणे इ. कामे करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.१३७, दि.१९.११.२०११**

**<u>ठराव</u>:-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र. ६४ मधील सन्मा.सदस्य श्री. विलास शिवराम सामंत यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु. १,९९,०००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा. अधिक्षक अभियंता, सा.बां. विभाग, ठाणे यांनी शिफारस केलेल्या सुशिक्षित बेरोजगार अभियंता मार्फत करुन घेण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु. १,९९,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष नव्याण्णव हजार मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक

महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी, असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ. सुजाता भास्कर पाटील अनुमोदक :- सौ. सुहासिनी सुनिल लोखंडे

सर्वानुमते मंजूर

**सही/-सौ. स्मिता मधुकर देशमुख**
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**<u>मा.अध्यक्ष महोदया, यांच्या पूर्व परवानगीने घेण्यांत येणारी आयत्यावेळेची प्रकरणे</u>**

**प्रकरण क्र.१३७**

**विषय:-** नौपाडा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र.६५ मध्ये "नगरसेवक निधी" अंतर्गत हिंदू कॉलनी येथील श्री यजेश्वर सहनिवास ते अल्हाद अपार्टमेंट पी.सी.सी. करणे, आल्हाद अपार्टमेंट समोर भिंतीकरिता गेट बसवणे व गोगाटे चौकात नामफलक बसविणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.१३८, दि.१९.११.२०११**

**<u>ठराव</u>:-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र. ६५ मधील सन्मा.सदस्य श्री. संजय संतु वाघुले वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु. १,२९,०००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा. उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.स. मार्फत करुन घेण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु. १,२९,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष एकोणतीस हजार मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी, असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ. सुजाता भास्कर पाटील अनुमोदक :- सौ. सुहासिनी सुनिल लोखंडे

सर्वानुमते मंजूर

**सही/-सौ. स्मिता मधुकर देशमुख**
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**मा.अध्यक्ष महोदया, यांच्या पूर्व परवानगीने घेण्यांत येणारी आयत्यावेळेची प्रकरणे**

**प्रकरण क्र.१३८**

**विषय:-** नौपाडा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र.६५ मध्ये "नगरसेवक निधी" अंतर्गत उत्तेकर चाळ येथील साईसदन ते रुक्मिणी अपार्टमेंट पर्यंत पायवाटेचे नुतनीकरण करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.१३९, दि.१९.११.२०११**

**ठराव :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र. ६५ मधील सन्मा.सदस्य श्री. संजय संतु वाघुले यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु. १,९७,०००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा. अधिक्षक अभियंता, सा.बां. विभाग, ठाणे यांनी शिफारस केलेल्या सुशिक्षित बेरोजगार अभियंता मार्फत करुन घेण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु. १,९७,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष सत्याण्णव हजार मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी, असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ. सुजाता भास्कर पाटील अनुमोदक :- सौ. सुहासिनी सुनिल लोखंडे

सर्वानुमते मंजूर

**सही/-सौ. स्मिता मधुकर देशमुख**
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**मा.अध्यक्ष महोदया, यांच्या पूर्व परवानगीने घेण्यांत येणारी आयत्यावेळेची प्रकरणे**

**प्रकरण क्र.१३९**

**विषय:-** नौपाडा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र.६७ मध्ये "नगरसेवक निधी" अंतर्गत विविध ठिकाणी बेंचेस बसविणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.१४०, दि.१९.११.२०११**

**ठराव :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र. ६७ मधील सन्मा.सदस्या सौ. अनिता हिराकांत फर्डे यांनी वरील

विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु. ४८,४००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा. उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.स. मार्फत करुन घेण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु. ४८,४००/- (अक्षरी रक्कम रुपये अठ्ठेचाळीस हजार चारशे मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी, असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ. सुजाता भास्कर पाटील — अनुमोदक :- सौ. सुहासिनी सुनिल लोखंडे

सर्वानुमते मंजूर

**सही/-सौ. स्मिता मधुकर देशमुख**
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**<u>मा.अध्यक्ष महोदया, यांच्या पूर्व परवानगीने घेण्यांत येणारी आयत्यावेळेची प्रकरणे</u>**

**प्रकरण क्र.१४०**

**विषयः-** नौपाडा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र.६२ मध्ये "प्रभाग सुधारणा निधी" अंतर्गत जुना आग्रा रस्ता येथील सेंट जॉन शाळालगत साईडपट्टी करिता पी.सी.सी. करणे झाकणे बसवणे इ. कामे करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.१४१, दि.१९.११.२०११**

**<u>ठराव</u>:-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र. ६२ मधील सन्मा.सदस्या सौ. सुहासिनी सुनिल लोखंडे यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु. ८७,६००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा. उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.स. मार्फत करुन घेण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु. ८७,६००/- (अक्षरी रक्कम रुपये सत्याऐंशी हजार सहाशे मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ 'अ' अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत असून,

प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी, असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ. सुजाता भास्कर पाटील अनुमोदक :- श्री. नारायण शंकर पवार

सर्वानुमते मंजूर

**सही/-सौ. स्मिता मधुकर देशमुख**
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

(अशा त-हेने साधक - बांधक चर्चा झाल्यानंतर मा. अध्यक्षा महोदया सायंकाळी ठिक ५.४० वा. सभा संपल्याचे जाहिर करतात.)

**सही/- श्री. ज्ञानदेव सा. वाघुले**
कार्यालयीन अधिक्षक
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

सचिव विभाग
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे
सभा समाप्त :- सायं. ५.४० वा.
दि. १९.११.२०११